Literacy for a Billion

Movie: Sulavarchi poli
Year: 1980

Song: Gal takun basalay koli
Lyricist: Rajesh, Anant Jadhav

ओ... हो
गळ टाकून बसलाय कोळी
न मी हो चमचमती मासोळी
गळ टाकून बसलाय कोळी
न मी हो चमचमती मासोळी
नका समजू मला साधी भोळी
असे ही रात्र वैऱ्याची काळी
माझ्या रामा जी रं
ओ...
गळ टाकून बसलाय कोळी
न मी हो चमचमती मासोळी
नका समजू मला साधी भोळी
असे ही रात्र वैऱ्याची काळी
माझ्या रामा जी रं

ही भयाण रात किर्र
दिवटी करी फुरफुर
ही भयाण रात किर्र
दिवटी करी फुरफुर
पायी सळसळते घुंगुर
तुणतुण्यानी धरलाय सूर
अंधारात चढे काजळी
रात्र आंधळी आज ह्या येळी
माझ्या रामा जी रं
ओ...
गळ टाकून बसलाय कोळी
न मी हो चमचमती मासोळी
नका समजू मला साधी भोळी
असे ही रात्र वैऱ्याची काळी
माझ्या रामा जी रं

रोखा नजरेची गोफण
मी तोफ मुलुख मैदान
रोखा नजरेची गोफण
मी तोफ मुलुख मैदान
नका होऊ धुंद बेभान
ठेवा ताब्यात आपलं मन
सुळावरची मी आहे पोळी
बंदुकीची गोळी ऐका मंडळी
माझ्या रामा जी रं
ओ...
गळ टाकून बसलाय कोळी
न मी हो चमचमती मासोळी
नका समजू मला साधी भोळी
असे ही रात्र वैऱ्याची काळी
माझ्या रामा जी रं

ऐका पाटील ऐका राव
जाणा डोळ्यांचा माझा भाव
ऐका पाटील ऐका राव
जाणा डोळ्यांचा माझा भाव
भर अंधारी झोपलाय गाव
कुणी साधील भलताच डाव
धन लुटून नेईन डोळी
सांभाळा झोळी आली आरोळी
माझ्या रामा जी रं

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*